पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 20/12/2019 (शुक्रवार)
(सायंकाळ)

---

## खून

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– अंतर्गत 04 कि. मी अंतरावर वार्ड क्र. 2, सालईधाबा येथे दिनांक 19/12/2019 चे 20.00 वा. ते 19.00 वा. दरम्यान आरोपी नामे– 1) प्रकाश गुलाबराव मसराम, वय 45 वर्ष व 2) रणजित गुलाबराव मसराम, वय 40 वर्ष दोन्ही रा. सालईधाबा, ह.मु. राजीव नगर, हिंगणा नागपूर यांचे विभीषन श्रीराम कामडी(मृतक), वय 45 रा. सालईधाबा याच्या सोबत जुन्या वादाच्या कारणावरुन पाच ते सहा दिवसापुर्वी झागडा–भांडण झाले होते. याबाबत मृतकाने पो. स्टे. ला रिपोर्ट दखल केली होती. याकारणावरुन आरोपीतांनी संगणमत करून विभीषन कामडी यास ठार मारण्याच्या उददेशाने त्याला सब्बलने व कुऱ्हाडीने वार करुन गंभीर जखमी केले. तसेच विभीषन कामडी याच्या भावास सुध्दा सब्बलीने मारहाण केली. विभीषन कामडी उपचाराकरीता माया हॉस्पीटल बुटीबोरी येथे नेले असता तेथून पुढील उपचाराकामी मेडीकल कॉलेज नागपूर येथे नेत असता त्याचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सौ. शोभा किशोर कामडी, वय 35 वर्ष रा. वार्ड क्र.2 सालईधाबा, ता. हिगंणा जि. नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीतांविरुध्द कलम 302 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री. विनोद ठाकरे हे करीत आहे.

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीस अटक

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 16 कि.मी. अंतरावर मौजा भंडारबोडी येथे दिनांक 19/12/2019 चे 16.05 वा. ते 17.00 वा. दरम्यान रामटेक पोलीस पथक यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन रामटेक पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एम. एच.– 36/एफ– 2451 क्रमांकाच्या वाहनाला थांबविले. सदर वाहन तपासले असता आरोपी नामे– शाहरूख अजीज शेख, वय 27 वर्ष, रा. कोरणी, गोंदीया याच्या वाहनामध्ये एकुण 4 (म्हशी,रेडे) कि. 80,000/–रू. ही जनावरे निर्दयतेने वाहतुक करीत असल्याचे तो मिळून आला. वाहनासह एकुण किंमती 3,80,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस शिपाई राजु भोयर, पो.स्टे. रामटेक यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे वरील आरोपीविरुध्द कलम 11(1)(अ)(ड)(ई)(एफ)(आय) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 119, 83, 130, 177 मोवाका काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक दिपक यादव हे करीत आहे.

# अकस्मात मृत्यू

1) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 05 कि. मी. अंतरावर मौजा भामेवाडा येथे दिनांक 17/12/2019 चे 11.30 वा. ते दिनांक 19/12/2019 चे 19.30 वा. दरम्यान सौ. सरस्वती मानीकरावजी उसरे, वय 50 वर्ष, रा. भामेवाडा या मनोरूग्ण व फीट येत असल्याने त्यांनी विहीरीत उडी मारल्याने पाण्यात बुडून त्यांचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– दिपक मानीकरावजी उसरे, वय 22 वर्ष, रा. भामेवाडा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार कुथे हे करीत आहे.

2) पो.स्टे. बोरी :– अंतर्गत वार्ड क्र. 1 जुनी वस्ती बुटीबोरी येथे दिनांक 06/12/2019 चे 08.30 वा. ते 09.00 वा. दरम्यान सावन संतोशराव शेंदरे, वय 28 वर्ष, रा. वार्ड क्र. 1, जुनी वस्ती, बुटीबोरी हा क्रीकेट खेळुन आल्यावर त्याच्या छातीत दुखत असल्याने त्यास उपचाराकामी प्रथम माया हॉस्पीटल बुटीबोरी व नंतर शुअरटेक हॉस्पीटल जामठा येथे भरती केले. तेथुन रेफर केल्यावर मेडीकल कॉलेज नागपुर येथे अपघात विभाग येथे दाखवीले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. कागदपत्र प्राप्त झाल्यावरुन सदरचा मर्ग नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– नितीन संतोशराव शेंदरे, वय 44 वर्ष, रा. वार्ड क्र 1, जुनी वस्ती बुटीबोरी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर